महाराष्ट्र शासन
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
(माध्यमिक शिक्षण विभाग)
फोन – ०२४०-२३४८५६४ ई-मेल आयडी rmsaaurangabad@gmail.com


जा.क्र.जिपछसं/शिमा/उमावि/२०२३-२४/9872 दिनांक :- 07/११/२०२३

प्रति,

१. अध्यक्ष/सचिव सहारा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

२. प्राचार्य/मुख्याध्यापक स्व. सिंधू मेमोरियल कनिष्ठ महाविद्यालय जाधववाडी, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

**विषय:-** सौ.गांधारीबाई प्रतिष्ठान औरंगाबाद संचलित स्व. सिंधू मेमोरियल कनिष्ठ महाविद्यालय जाधववाडी, औरंगाबाद ह्या विनानुदानित कनिष्ठ महाविद्यालयाचे सहारा शिक्षण प्रसारक मंडळ ,औरंगाबाद या संस्थेस व्यवस्थापन हस्तांतर करणेबाबत.

**संदर्भ** -:१.शासन निर्णय क्र.: माशाह-३३२२/प्र.क्र.३०७/एस.एम.-१ दि. २४.०३.२०२३

२.शासन निर्णय क्र.:माशाह-२०११/(२१०/११)/माशि-३ दिनांक १७.०२.२०१२

३. मा. शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश क्र. शिउसंऔ/कमवि-२/ २०२२-२३/९२६८ दि. ०६.११.२०२३

उपरोक्त संदर्भाधीन विषयाच्या अनुषंगाने आपणास अवगत करण्यात येते की, सौ.गांधारीबाई प्रतिष्ठान औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) संचलित स्व. सिंधू मेमोरियल कनिष्ठ महाविद्यालय जाधववाडी ,औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) ह्या विनानुदानित कनिष्ठ महाविद्यालयाचे व्यवस्थापन सहारा शिक्षण प्रसारक मंडळ ,औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) या संस्थेस हस्तांतरीत करणेबाबत संदर्भीय क्र. ०१ शासन निर्णयाअन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

स्व. सिंधू मेमोरियल कनिष्ठ महाविद्यालय जाधववाडी ,औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) ह्या विनानुदानित कनिष्ठ महाविद्यालयाचे व्यवस्थापन सहारा शिक्षण प्रसारक मंडळ ,औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) या संस्थेस हस्तांतरीत करण्यास खालील नमूद अटी व शर्तीच्या आधारावर मान्यता देण्यात आलेली आहे.

१. व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.
२. व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या/मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्ती मध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.
३. शासनाकडून शाळा,शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी , तन/वेतनेत्तर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम,नियम, आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेस बंधनकारक राहील.
४. सदर व्यवस्थापन बदल शासन निर्णय , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , क्र. माशाह-२०११/(२१०/११)/माशि-३, दिनांक १७.०२.२०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपद्धतीअमलातयेईल.
५. सदर व्यवस्थापन बदला संदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे नव्याने तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदला संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन

बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्तीचा नवीन संस्थेद्वारा भंग झाल्यास ,हस्तांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

६. तसेच संदर्भ क्र. ०२ नुसार सदर कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्यवस्थापन बदलाबाबत आदेश निर्गीमित करण्यात आलेले आहे.

संदर्भीय शासन निर्णयातील अटी व शर्तीचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(मधुकर देशमुख)
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर**

**प्रतिलिपी** :- माहितीस्तव सविनय सादर

१. मा.श्री. प्रवीण मुंढे, अवर सचिव, महाराष्ट्र शासन.
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ),शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे.
३. मा. शिक्षण उपसंचालक,छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

**प्रतिलिपी** :- आवश्यक कार्यवाहीस्तव.
अध्यक्ष/सचिव सौ.गांधारीबाई प्रतिष्ठान औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).